**लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा**
**भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१**
**दूरध्वनी क्र.०२२—२६४७२७८७/२६४७३५८८**
**E-Mail: scc-bandra@bhc.gov.in**

# जाहीर निविदा

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा भास्कर इमारत येथील तिसरा मजला ते आठवा मजला येथे बसविण्यात आलेल्या अग्निशमन यंत्रांमध्ये वायू/रसायनांचा (Refilling of Fire Extinguishers) भरणा करण्यासाठी मोहोरबंद (Sealed) दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**भरणा करावयाच्या अग्निशमन यंत्रांचा तपशील खालीलप्रमाणे.**

| Sr. No. | Description of Articles | Total Number of Fire Extinguishers to be refilled |
|---|---|---|
| 1. | Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (9 kg. Capacity) | 13 |
| 2. | Refilling of Water Co2 type Fire Extinguishers (9 Ltr. Capacity) | 12 |
| 3. | Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (5 kg. Capacity) | 17 |
| 4. | Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (2 kg. Capacity) | 1 |
| | **TOTAL :** | **43** |

तरी इच्छुक ठेकेदारांनी आपले दरपत्रके **मोहोरबंद लखोटयामध्ये**, त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"Quotation for Refilling of Fire Extinguishers"** असे लिहून त्या **"अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१"** यांच्याकडे **दिनांक २३ मार्च, २०२३ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. सदर सविस्तर दरपत्रक सुचनांची माहिती मा.उच्च न्यायालय, मुंबईच्या http://www.bombayhighcourt.nic.in व लघुवाद न्यायालय, मुंबई च्या http://ecourts.gov.in/ small-causes या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

तसेच दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी दुपारी ५.०० वाजता या न्यायालयाच्या संबंधित समितीसमोर दरपत्रके उघडण्यात येतील. सदरवेळी दरपत्रकधारक किंवा त्यांच्या

मार्फत अधिकृत प्रतिनिधी यांनी हजर राहावे लागेल याची कृपया नोंद घ्यावी. दरपत्रक स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा/नाकारण्याचा अंतिम अधिकार हा मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांचा असेल.

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा )
)
)
मुंबई: १४ मार्च, २०२३ )

14/03/2023

(अतुल ग. राणे)
अप्पर प्रबंधक

## लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा
**भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१.**

## <u>दरपत्रक सुचना</u>

**अग्निशमन उपकरणांमध्ये (Fire Extinguishers) वायू/रसायन भरणा (Refilling) करण्यासाठी दरपत्रकधारकांनी अंमलात आणावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

| | |
|---|---|
| १. | दरपत्रकधारकाने / संस्थेने अग्निशमन उपकरणांमध्ये वायू/रसायन भरणा करण्याबाबत शासनाकडून मिळालेल्या परवान्याची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. |
| २. | दरपत्रकधारकाने / संस्थेने आयकर रिटर्न भरले बाबत मागील तीन वर्षाच्या साक्षांकित प्रती. सेवाकर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, पॅन कार्ड, जी.एस.टी. क्रमांक, इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकीत प्रती देखील दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे पुर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता, ई—मेल आयडी, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक दरपत्रक पाकीटावर नमूद करावे. |
| ३. | दरपत्रकधारकाने/संस्थेने यापूर्वी ज्या ठिकाणी अग्निशमन उपकरणांमध्ये वायू/रसायन भरणा केलेला आहे. त्याचा तपशील व सदर संस्थेने/कार्यालयाने वितरीत केलेले सदर कामाबाबतचे प्रमाणपत्र/पत्र दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| ४. | दरपत्रकधारकाने / संस्थेने दरपत्रक विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयाच्या वरच्या भागावर मोठ्या अक्षरात **"अग्निशमन उपकरणांमध्ये (Fire Extinguishers) वायू/रसायन भरणा (Refilling) करण्यासाठी दरपत्रक"** असे लिहून **"अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१" यांच्याकडे दिनांक २३ मार्च, २०२३ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात. |
| ५. | दरपत्रकधारकाने / संस्थेन दरपत्रकासोबत असलेल्या सर्व अटी मंजूर असल्याचे व त्या अटींचे पालन करण्यात येईल असे लेखी हमीपत्र द्यावे लागेल. |
| ६. | पात्र ठरलेल्या दरपत्रकधारकाने / संस्थेचे देयक पारित करण्यासाठी अधिदान व |

| | |
|---|---|
| | लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतर दरपत्रकधारकाला रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल. |
| ७. | दरपत्रके हे दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी दुपारी ५.०० वाजता या न्यायालयाच्या संबंधीत समितीसमोर उघडण्यात येतील. त्यावेळेस दरपत्रकधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांनी हजर राहावे. त्यावेळेस हजर नसलेल्या दरपत्रकधारकांची कुठल्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ८. | मा.मुख्य न्यायाधीश साहेब यांना दरपत्रक प्रक्रिया रद्द किंवा त्यामध्ये बदल करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्याबद्दल कोणतीही तक्रार वा आक्षेप स्विकारले जाणार नाहीत. |

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा )
)
)
मुंबई: १४ मार्च, २०२३ )

14/03/2023

(अतुल ग. राणे)
अप्पर प्रबंधक